नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०४/२०२५ (शनिवार)**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवा निमित्य घेण्यात आल्या बैठक.

आगामी सणोत्सवा दरम्यान नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन बोरी, मौदा, रामटेक, एम.आय.डी.सी. बोरी, बेला,जलालखेडा,केळवद देवलापार येथे पोलीस पाटील/शांतता समिती सदस्य/ मिरवणुकीचे आयोजक यांची बैठक घेण्यात आली आहे.

**दिनांक ०४/०४/२०२५** रोजी पोलीस निरीक्षक श्री सतिशसिंग राजपुत, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी यांनी **पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी** येथे , पोलीस निरीक्षक श्री सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांनी **पोलीस स्टेशन मौदा** येथे , पोलीस निरीक्षक श्री आसाराम शेटे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन रामटेक यांनी **पोलीस स्टेशन रामटेक** येथे , सहा.पोलीस निरीक्षक श्री चेतनसिंग चव्हाण , प्रभारी अधिकारी **पोलीस स्टेशन बेला** यांनी पोलीस स्टेशन बेला येथे, सहा.पोलीस निरीक्षक श्री तुषार चव्हाण , प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे पोलीस पाटील/शांतता समिती सदस्य/ मिरवणुकीचे आयोजक यांची बैठक घेतली. नमुद प्रभारी अधिकारी यांनी नमुद ठिकाणी सणोत्सवा दरम्यान निघणाऱ्या मिरवणूकींचे चे आयोजक यांची बैठक घेतली. सदर बैठक आगामी येणाऱ्या श्रीराम नवमी, भगवान महावीर जयंती , हनुमान जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त्य घेण्यात आली होती. सदर बैठकीत आगामी सणोत्सव शांततेत पार पाडणेबाबत, जातीय सलोखा ठेवुन कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच मिरवणुकी दरम्यान कोणत्याही प्रकारची जातीय

तेढ होवुन धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये, ध्वनी प्रदुषण बाबत नियम, मिरवणुकीच्या वेळा पाळणेबाबत याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

**दिनांक ०५/०४/२०२५** रोजी श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग आणि पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बोरी यांनी पोलीस स्टेशन बोरी येथे सणोत्सवा दरम्यान निघणाऱ्या मिरवणूकींचे चे आयोजक ,लोधीशहा बाबा दर्गा,जुनी वस्ती, बुटीबोरी चे समिती सदस्य आणि शांतता समिती सदस्य तसेच पोलीस पाटील यांची बैठक घेतली. बैठकीत हजर असलेलया सदस्यांना श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग आणि प्रभारी अधिकारी बोरी पोलस स्टेशन यांनी आगामी सणोत्सव शांततेत पार पाडणेबाबत, जातीय सलोखा ठेवुन कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच मिरवणुकी दरम्यान कोणत्याही प्रकराची जातीय तेढ होवुन धार्मिक भावना दुखावतील असे वर्तन करू नये. याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.


सहा.पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन केळवद यांनी **पोलीस स्टेशन केळवद** येथे ,सहा.पोलीस निरीक्षक श्री नारायण तुरकुंडे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन देवलापार यांनी **पोलीस स्टेशन देवलापार** येथे पोलीस पाटील यांची बैठक आयोजीत केली होती.बैठकीत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले .

## पोलीस स्टेशन बोरी





## पोलीस स्टेशन मौदा



## पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी



## पोलीस स्टेशन रामटेक



## पोलीस स्टेशन बेला



## पोलीस स्टेशन जलालखेडा



# पोलीस स्टेशन केळवद



# पोलीस स्टेशन देवलापार



## नागपुर ग्रामीण जिल्हयात अवैध अग्निशस्त्र बाळगणाऱ्यांवर २ गुन्हे नोंद

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने आणि मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा आणि खापरखेडा पोलीस यांनी अवैध अग्निशस्त्राबाबत कारवाई करून २ गुन्हे नोंद केले.

कारवाई क्र . १ श्री संतोष गायकवाड ,उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या नेतृत्वात खापरखेडा पोलीस अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, सुरज उर्फ मुसा रमेश वरनकर, रा. चनकापूर बंदुक ठेवली आहे. अशी माहीती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन आरोपीला गाठुन त्याचे नाव पत्ता विचारले असता **सुरज उर्फ मुसा रमेश वरनकर वय ३५ वर्ष रा. चनकापूर अशी माहीती प्राप्त झाली.** आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे जवळ देशी बनावटीचा कट्टा मिळुन आले. आरोपीला अग्निशस्त्र परवान्याबाबत विचारले असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन **एक देशी बनावटीचा कट्टा किंमती २५,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी विरूध्द कलम ३,५,२५ भा.ह.कायदा सह कलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

कारवाई क्र . २ स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अग्निशस्त्रांबाबत कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना एक संशयीत इसम पोलीसांना पाहुन पळुन जावु लागला. सदर इसम संशयीत वाटल्याने पोलीसांनी त्याचा पाठलाग करून आरोपीला गाठुन त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **राष्ट्रपाल मधुकर मेश्राम, वय ३१ वर्ष, रा. पिपळा डाग बंगला** अशी माहीती प्राप्त झाली. आरोपीची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे ताब्यात एक देशी बनावटी चे अग्निशस्त्र माऊजर मिळुन आले. आरोपीला अग्निशस्त्राबाबत परवाना विचारला असता त्याच्या कडे परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. आरोपीला सदर अग्निशस्त्र कोठुन आणले याबाबत विचारणा केली असता त्याने सदर अग्निशस्त्र आरोपी नामे बोदु उर्फ देवधन तेलंगे रा खापरखेडा याचे असल्याबाबत माहीती दिली. पोलीसांनी आरोपीच्या **ताब्यातुन एक लोखंडी देशी बनावटीचे अग्निशस्त्र माऊजर किंमती २५,००० /— रूपये आणि १ ॲंड्रॉईड मोबाईल किंमती १५,०००/— रूपये, असा एकुण ४०,००० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त**

केला. दोन्ही आरोपीतांविरूध्द कलम ३,५,२५ भा.ह.कायदा सह कलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ७९ लाख ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त पारशिवणी पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— पारशिवणी पोलीस, अवैध धदयांवर कारवाई करणे कामी पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई करून दोन गुन्हे नोंद केले.

**कारवाई क्रं १.** दिनांक ०३/०४/२०२५ रोजी पोलीसांनी मौजा आमडी फाटा शिवार, गडे धाबाजवळ येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहन **ट्रक क्र एमएच—३४ बीं १६३९** हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रक चालक आरोपी नामे** भिमसेन मथुरा केवट,वय ३७ वर्षे रा. शास्त्री नगर गिट्टीखदान, काटोल रोड नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता** अमर लांजेवार रा.नागपुर असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ३०,०००/—रूपये आणि २) ट्रक क्र एमएच—३४ बीं १६३९ किंमती ५०,००,०००/—रूपये असा एकुण ५०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्रं १.** दिनांक ०४/०४/२०२५ रोजी पोलीसांनी पारशिवणी ते साहोली रोड वर ग्रम्स कंपनी चौकात नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान दोन संशयीत वाहन मिळुन आले १. **टिप्पर ट्रक क्र. एमएच ३६ एफ—३०२७** हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. २. **टिप्पर ट्रक क्र.एमएच— ४०/बीजी ६०२१** हे वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली **. टिप्पर ट्रक क्र. एमएच ३६ एफ—३०२७ चा चालक आरोपी नामे** साबीर युसुफ टेले रा. बिना संगम, ता.कामठी याला परवान्याबाबत

विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **टिप्पर ट्रक क्र.एम एच– ४०/बीजी ६०२१ चा चालक आरोपी नामे** राजकुमार शंकर नागोसे वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र. ३ इंदिरा नगर खापरखेडा जि. नागपुर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **ट्रक मालकाबाबत विचारपुस केली असता** संजय लांजेवार रा.वार्ड क्र.४ भानेगाव, खापरखेडा असे नाव समजले. पोलीसांनी पंचासमक्ष **१) टिप्पर ट्रक क्र. एमएच ३६ एफ–३०२७ किंमती १५,००,०००/–रूपये आणि ४ ब्रास रेती किंमती ८,०००/– रूपये असा एकुण १५,०८,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. २) टिप्पर ट्रक क्र.एमएच– ४०/बीजी ६०२१ किंमती १४,००,०००/–रूपये आणि ४ ब्रास रेती किंमती ८,०००/– रूपये असा एकुण १४,०८,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाई मध्ये तीन वाहन, १८ ब्रास रेती सह एकुण ७९,४६,०००/–रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ५ आरोपीतांवर पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आरोपी १. भिमसेन मथुरा केवट,वय ३७ वर्षे रा. शास्त्री नगर गिट्टीखदान, काटोल रोड नागपूर, २. साबीर युसुफ टेले रा. बिना संगम, ता.कामठी ३. राजकुमार शंकर नागोसे वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र. ३ इंदिरा नगर खापरखेडा जि. नागपुर यांना अटक करण्यात आली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने